राज्य योजना सन २०१७-१८
डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना (२४०६ ८७११) निधी वितरीत करणे.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०५१७/प्र.क्र. १४८/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक :- १४ मार्च, २०१८.

वाचा :-

१. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०५.१५/प्र.क्र.१५५/फ-१, दिनांक ०४.०८.२०१५.
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८.०४.२०१७.
३. वित्त विभागाचे परिपत्रक कमांक :-अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दिनांक ३०.०६.२०१७.
४. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-१/यो/इए/नबाप्र/ प्र.क्र. १० (१५-१६)/११४४/१७-१८, दिनांक :- १४.०९.२०१७.
५. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्यूएलपी -०४.१७/प्र.क्र.१२७/फ-१, दिनांक २१.०९.२०१७.
६. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-१/यो/इए/नबाप्र/ प्र.क्र. १० (१५-१६)/११७६/१७-१८, दिनांक :- २१.०९.२०१७.
७. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-१/यो/इए/नबाप्र/ प्र.क्र. १० (१५-१६)/१२३०/१७-१८, दिनांक :- २७.०९.२०१७.
८. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-१/यो/इए/नबाप्र/ प्र.क्र. १० (१५-१६)/१८९३/१७-१८, दिनांक :- ०९.०१.२०१८.
९. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-१/यो/इए/नबाप्र/ प्र.क्र. १० (१५-१६)/१९१७/१७-१८, दिनांक :- ११.०१.२०१८.
१०. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६.०२.२०१८.
११. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-१/यो/इए/नबाप्र/ प्र.क्र. १० (१५-१६)/२३७/१७-१८, दिनांक :- ०९.०३.२०१८.

प्रस्तावना :-

वनालगतच्या गावातील लोकांचा वनव्यवस्थापनासाठी सहभाग मिळावा, त्यांचे वनावरील अवलंबन कमी करून वनांवरील पर्यायाने वन्यजीवांवरील ताण कमी करणे यासाठी या योजनेत संयुक्त वन व्यवस्थापन समिती/ग्राम परिसर विकास समिती मार्फत “ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम ”ही योजना राबवली जात आहे. राज्यात एकूण ६ राष्ट्रीय उद्याने व ४८ अभयारण्ये आहेत. त्यापैकी ५ राष्ट्रीय उद्याने आणि १४ अभयारण्यांचे क्षेत्रावर ६ व्याघ्र प्रकल्प घोषित करण्यात आले आहेत. व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात तसेच अभयारण्यांच्या लगतच्या क्षेत्रातील गावात मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने तसेच ग्रामस्थांचा वन्यजीव संरक्षणात सक्रिय सहभाग वाढावा ह्या दृष्टीने “डॉ . श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना” संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये घोषित करण्यात आली आहे.

२. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेमध्ये (२४०६ ८७११) सन २०१७-१८ करीता रु.१०,०००.०० लक्ष अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

“ वित्त विभागाच्या दिनांक १८.०४.२०१७ च्या परिपत्रकानुसार निश्चित केलेल्या निधी वितरणाच्या मर्यादेमध्ये बदल करण्यात येत असून प्रशासकीय विभागांना चालू वित्तीय वर्षाच्या कालावधीसाठी महसूली लेख्यातील निधी ७०% तसेच भांडवली लेख्यातील निधी ८०% इतक्या मर्यादेत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.”

३. वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना (२४०६ ८७११) या लेखाशिर्षांतर्गत रुपये १०,०००.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या नियतव्ययापैकी रु. ७,०००.०० लक्ष निधी वितरीत करण्यास प्रशासकिय विभागास मंजूरी प्रदान करण्यात आले होते. त्यानुसार सदर योजनांतर्गत आतापर्यंत विविध शासन निर्णयान्वये रु. ७०००.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

४. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना (२४०६ ८७११) या राज्य योजनांतर्गत वनालगत असलेल्या गावांमध्ये १००% कुटुंबाना LPG गॅस कनेक्शन देतांना गॅस कनेक्शन सोबत दोन भरलेले सिलेंडर व प्रथम वर्षाचे उर्वरीत कालावधीसाठी ६ असे प्रथम वर्षाकरिता एकूण ८ सिलेंडर व दुस-या वर्षाकरिता सवलतीच्या दरात ६ सिलेंडर ७५ टक्के शासकीय अनुदान तर २५ टक्के लाभार्थ्याचे योगदान या तत्वावर वाटप करण्याच्या कार्यबाबीचा समावेश करुन सदर योजनेच्या व्याप्तीत वाढ करण्याचा निर्णय संदर्भ क्रमांक ५ च्या शासन निर्णयान्वये जारी करण्यात आला आहे.

५. दरम्यानच्या काळात वित्त विभागाने संदर्भ क्रमांक १० च्या परिपत्रकानुसार सन २०१७-१८ मधील निधी वितरणाबाबत सुधारीत आदेश निर्गमित केले आहेत. सदर आदेशात खालील प्रमाणे नमूद करण्यात आले आहे.

"सन २०१७-१८ चा उर्वरित कालावधी, वितरीत निधी व त्याचा झालेला विनियोग पाहता, आता वरील प्रयोजनाव्यतिरिक्त महसूली लेख्यातील अनिवार्य खर्चाच्या बाबीवर अर्थसंकल्पीय निधी खर्च करण्याची मर्यादा ९० टक्के तसेच उर्वरित इतर सर्व बाबींवरील (महसूली कार्यक्रम खर्च / भांडवली अनिवार्य व कार्यक्रम खर्च) खर्चाची मार्यादा ८० टक्के एवढी विहित करण्यात येत आहे.

६. सबब वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक १० च्या शासन निर्णयान्वये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना (२४०६ ८७११) या योजनांतर्गत रु. १०००.०० लक्ष निधी वितरणासाठी शिल्लक आहे.

शासन निर्णय :-

अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्रमांक ४, ६, ७, ८, ९ व ११ च्या पत्रान्वये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना (२४०६ ८७११) या योजनांतर्गत रु.५४१९.४९३२ लक्षचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी आवश्यकता व निकड असलेल्या लाभार्थीचा प्राधान्याने विचार करुन वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक २, ३ व ११ च्या परिपत्रकानुसार वितरणाकरीता **शिल्लक रु. १०००.००० लक्ष** निधी च्या मार्यादेत खालील अटींच्या अधीन राहून निधी खर्च करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

I. सदर योजनेवर खर्ची टाकावयाची रक्कम सन २०१७-१८ मध्ये लेखाशिर्ष क्रमांक २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०२, पर्यावरणीय वनिकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवांचे संरक्षण, (००) (१८) डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना (२४०६-८७११)अंतर्गत उद्दिष्टनिहाय, अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे प्राप्त होणाऱ्या निधीतून करण्यात यावा.

II. योजनांतर्गत प्रस्तावित कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा.

III. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

IV. सदर योजनेच्या अनुषंगाने जारी करण्यात आलेल्या संदर्भ क्रमांक १ व संदर्भ क्रमांक ६ च्या शासन निर्णयाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

V. वित्त विभागाचे संदर्भीय परिपत्रक क्रमांक :- २, ३ व ११ चे काटेकोर पालन करावे.

VI. तक्त्यातील नमुद ज्या विभागनिहाय लाभार्थीना सदर योजनेचा लाभ देण्यात आला आहे. त्या लाभार्थीबाबत शासनास अवगत करण्यात यावे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६.०२.२०१८ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१४१७२२५५८९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2018.03.14 17:23:41 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई.
६. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर.
७. वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.
८. वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे.
९. वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक.
१०. महालेखापाल१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षण), मुंबई/नागपूर
११. फ-१/२ ,ब कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

****